


आपल्या पत्नीला सन्मानाने वागवणारे, त्यांच्या सुख-दु:खात सहभागी होणारे मजरूह सुलतानपुरी त्यांच्या पत्नीसाठी आजही आठवणींच्या रूपात हयात आहेत.

□ विजय अकेला

मजरूह सुलतानपुरींसमवेत फिरदोस




ते हाडाचे गीतकार होते - फिरदोस सुलतानपुरी

मैं अकेला ही चला था
जानिब ए मंजिल
मगर लोग साथ आते गये और
कारवां बनता गया

— मजरूह सुलतानपुरी

२४ मे, मजरूह सुलतानपुरी यांचा पहिला स्मृतिदिन. या मनस्वी, यशस्वी, लोकप्रिय गीतकाराची प्रेरणा ठरलेल्या, आयुष्यातील चढ-उतारात त्यांची धीराने सोबत करणाऱ्या त्यांच्या पत्नी फिरदोस सुलतानपुरी यांनी त्यांच्या वैवाहिक जीवनातील कडू-गोड आठवणींना पुन्हा एकदा उजाळा देण्याचा प्रयत्न केला आहे.



संगीतकार मिलिंदसह मजरूह

काय सांगू? त्यांच्यासारखा माणूस शोधून सापडणार नाही. माझ्यासोबत त्यांनी व्यतीत केलेला प्रत्येक क्षण त्यांच्यातील एका महान व्यक्तित्वाची साक्ष देणारा होता. आमचं लग्न झालं तेव्हा ते शायरीच्या दुनियेतले बेताज बादशहा होते आणि मी? मला या वातावरणाची अजिबात सवय नव्हती. ना इथल्या राहणीची ना बोलचालीची.

पण त्यांनी मला त्याबाबत कधीच हिणवलं नाही. उलट मला जगाची सफर करवली. चारचौघात उठण्या-बसण्याची कला शिकवली. ते कधीही मला बरोबर घेतल्याशिवाय कुठेच जात नसत. मी माझ्या मुलींना आणि नातींना पण असंच भाग्य लाभो ही नेहमीच प्रार्थना करते. अर्थात, मजरूहजींसारखा प्रेमळ पती आपल्या आधी संसारातून निघून जाण्याचं दुःख मी अनुभवलं ते इतरांच्या मात्र वाट्याला न येवो.

मजरूहसाहेब १९४५मध्ये मुंबईला आले. त्यांचं इथे बस्तान बसल्यानंतर तीन वर्षांनी म्हणजे १९४८मध्ये आमचं लग्न झालं. ५२ साली दोन मुलींना घेऊन मी त्यांच्या सोबतीने मुंबईत आले. सुरुवातीला आम्ही वर्सोव्याला एका भाड्याच्या जागेत राहिलो. पण ते सहाच महिने. नंतर अंधेरीला चिनॉय कॉलेजजवळच एक घर घेतलं. मुंबईत आल्यानंतर आमच्या चौकोनी कुटुंबात आणखी एक मुलगी आणि दोन मुलांची भर पडली. आता आमचं कुटुंब खऱ्या अर्थाने भरलं. घर झालं.

माझी पहिली मुलगी नौगुल हिच्या जन्माच्या वेळी मी लखनौमध्ये होते. मुलीच्या जन्माची बातमी त्यांना मिळाली तेव्हा ते तुरुंगात होते. त्यावेळी मीरसाहेबांची शायरी वाचत असताना नौगुल शब्द वाचनात आला. त्यावरून त्यांनी मुलीचं नाव नौगुल ठेवलं.

दुसरीचं नाव नौबहार आणि तिसरी सबा. प्रसिद्ध संगीतकार नौशाद यांच्या मुलाशी सबाचा विवाह झाला. ऐमन हा माझा मुलगा आज आमच्यात नाही. धाकटा अन्दलीप चित्रपट व्यवसायातच आहे. मध्यंतरी त्याने *जानम समझा करो* या चित्रपटाची निर्मिती केली होती.

आज त्या आठवणींनीही जीव व्याकुळ होतो. मजरूहसाहेबांची तर क्षणोक्षणी उणीव जाणवते. मी सतत त्यांची आठवण काढते. ते वरचेवर माझ्या स्वप्नातही येतात. मग आम्ही दोघं खूप गप्पा मारतो.

मजरूहसाहेब खूप रागीट होते. त्यांना खोटेपणा चालत नसे. ते स्वतः कधी खोटं बोलत नसत. स्पष्टवक्तेपणा हा त्यांचा आणखी एक गुण. त्यांचा आणखी एक सांगण्यासारखा गुण म्हणजे ते चांगले खवय्ये होते. वेगवेगळ्या स्वादिष्ट पदार्थांची पानात रेलचेल असायलाच हवी. पण ते शक्यतो घरात बनवलेलं असावं असाही त्यांचा कटाक्ष असायचा. त्यांचा पेहराव नेहमी लखनौहून शिवून यायचा. कुरता-पायजमा हा साधा पोशाख त्यांना आवडायचा. पहाटे लवकर उठून कामाला लागायची त्यांची सवय शेवटपर्यंत होती. वय वाढलं तशी रात्रीची झोप कमी झाली होती. अशावेळी ते पुस्तकं वाचण्यात वेळ घालवत. पण म्हणून सकाळी उशिरापर्यंत कधीच झोपून राहात नसत.


मजरूहसाहेब स्वतः गीतकार असले तरी त्यांना खेळातही रुची होती. खास करून क्रिकेटमध्ये. क्रिकेटची मॅच चालू असली की ते टीव्हीसमोरून हलायचे नाहीत. डिस्कव्हरी चॅनलवरील प्राण्यांविषयीचे कार्यक्रम पाहणं त्यांना आवडायचं. शिवाय बुद्धिबळ आणि पत्ते हे बैठे खेळ त्यांना प्रिय होते. बऱ्याच जणांना माहीत नसलेला आणखी एक छंद त्यांना होता, शिकारीचा. त्यांच्या मृत्यूच्या दीडएक महिना अगोदर ते जावयाबरोबर सत्तापूर येथे शिकारीसाठी गेले होते. आठवडाभर तिथे राहिले, तिथून परत आल्यानंतर *क्या कहना*च्या कॅसेट रिलीज समारंभालाही आवर्जून गेले. शेवटपर्यंत ते आपल्या कामात व्यस्त राहिले.

आजही लोक त्यांची गाणी आवडीने ऐकतात. *वन टू का फोर* आणि *ये है आशा* हे त्यांचे अल्बम प्रदर्शित झाले आहेत. त्याला आशा भोसलेंचं संगीत आहे. पण मला मात्र *ममता, पेईंग गेस्ट* किंवा *अभिमान* यासारखी त्यांची जुनी गीतंच अधिक आवडतात. त्यांचा अखेरचा चित्रपट अनु मलिक यांच्याबरोबर होता. अनु नेहमीच त्यांच्या गीतातले बोल उलटसुलट करत असे. पण ते त्यांना अजिबात आवडायचं नाही.

आमच्या घरातलं वातावरण कधीच फिल्मी नव्हतं. दोन्ही मुलं दिग्दर्शनाकडे वळली. जावईही याच क्षेत्रातले आहेत. पण असं असूनही आम्ही आमचं घर मात्र त्या

झगमगाटापासून लांब ठेवलं. तसे चित्रपट व्यवसायातले अनेक आमच्या मित्रपरिवारात होते. राजेंद्र सिंह, अमरकुमार, किशनचंद, सरदार जाफरी, नासिर हुसेन अशी बरीच नावं सांगता येतील.

आयुष्यात अनेक चढ-उतार पाहिले. यश पाहिलं. सुखाचे प्रसंग अनुभवले तर दुःख पचवलं. आज त्या सगळ्याची आठवण नाही. कारण सुख-दुःखाच्या या आघातांनी आता स्मृती थोडी कमजोर झाली आहे.



गीतकार मजरूह सुलतानपुरींची मुलाखत घेताना विजय अकेला

मित्रमंडळी आणि नातेवाईकांशी त्यांचे संबंध नेहमी जिव्हाळ्याचे असत. कधीकधी ते अचानक समोरच्यावर रागावत पण मग त्यांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले की लगेच हळवे होत.

कुराण त्यांना तोंडपाठ होतं. त्यांचं शिक्षण उर्दू आणि फार्सीत झालं होतं. ते स्वतः गावात हकीम म्हणून काम करत होते. त्यामुळे पुढे मुंबईत आल्यानंतरही त्यांनी कधीच डॉक्टरचं औषध घेतलं नाही. शेवटपर्यंत स्वतःचीच औषधं घेत होते.

आजच्या निर्माता-दिग्दर्शकांपैकी किंवा नव्या संगीतकारांपैकी ते कोणाला फारसं पसंत करत नव्हते. जतीन-ललित आणि आनंद-मिलिंदचा अपवाद. गेल्या पिढीतील एस. डी. बर्मन, मदन मोहन, नौशादसाहेब आणि आर. डी. बर्मन यांच्याशी मात्र त्यांचं चांगलं जमायचं.

मी त्यांना संजय म्हणायची आणि ते मला बेगम. त्यांनी मला जगभर फिरवलं. लेनिनग्राड, लंडन, अमेरिका, पॅरिस वगैरे बऱ्याच ठिकाणी मी त्यांच्याबरोबर मुशायऱ्यांना जायची. आम्ही जोडीने भारतभ्रमणही केलंय.

त्यांच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त देशभरातील कवींनी मुशायरे आयोजित करून त्यांना आदरांजली वाहिली. पण दुर्दैवाने हिंदी चित्रपट व्यावसायिकांनी मात्र काहीही केलं नाही. इतकंच काय पण फिल्मसिटीचं नामांतर करून दादासाहेब फाळके चित्रनगरी ठेवण्यात आलं त्या समारंभाचं साधं निमंत्रणही आम्हाला देण्याचं कोणाला सुचलं नाही.

आमच्या घरात शहेनशहा अकबरच्या काळापासूनचे अनेक दुर्मिळ ग्रंथ सांभाळून ठेवले होते. तसेच फार्सी आणि अरबी भाषेतलेही अनेक ग्रंथ होते. त्यातले बरेच ग्रंथ आम्ही जवळच्या रिझवी कॉलेजच्या लायब्ररीला दिले.

मजरूह साहेबांची प्रतिभा चित्रपट आणि शायरी अशा दोन ठिकाणी विभागली गेली. त्यांचे गुरू जिगर मुरादाबादी यांनी त्यांना चित्रपटासाठी गीतं लिहिण्याचा सल्ला दिला नसता तर आज त्यांनी शायरीमध्ये यापेक्षाही मोठा पल्ला गाठला असता.

त्यांच्यावर अन्यायही खूप झाला. ५५ साली सीआयडीची सगळी गीतं मजरूह साहेबांनी लिहिली होती. त्यानंतर त्यांना एका ठिकाणी मुशायऱ्याला जावं लागलं. तेव्हा 'आँखों ही आँखों में...' हे गीत निसार अख्तर यांच्याकडून लिहून घेतलं गेलं. तीच गोष्ट *पाकिजा*ची. या चित्रपटाची सगळी गीतं मजरूह साहेबांनी लिहिली पण त्यातल्या काही ओळींवर कैफींनी संस्कार केले, त्या बदलल्या. पण त्यामुळे सीआयडीचे गीतकार म्हणून निसार अख्तर नावारूपाला आले आणि कोई मिल गया था सरे राह चलते चलते हे गीत कैफींच्या खाती नोंदवलं गेलं. अशा प्रकारांमुळे ते दुःखी होत.

ते हाडाचे गीतकार होते. आजूबाजूला कितीही गोंगाट असो की मुलांची मस्ती चालो ते शांतपणे गीतं लिहीत. त्यासाठी मुद्दाम उठून समुद्रकाठी, शेतात किंवा निर्मनुष्य जागी जाऊन लिहिण्याची त्यांना गरजच भासत नसे. घराच्या उंबरठ्यावर बसूनही त्यांना गीतं सुचत. एका दिवसात तीन तीन गाणी तीही अर्थपूर्ण लिहिण्याची प्रतिभा त्यांच्यात होती.

मजरूह साहेबांच्या चित्रपट गीतांवर आधारित पुस्तकाचं लेखन कोणीतरी करत आहे. आता त्यांना गीतं शोधण्यात अडचणी येत असल्याचं समजलं. त्या येणारच. मजरूहजींनी भोजपुरी चित्रपटांतही गीतलेखन केलं आहे. ती गीतं मिळवणं अडचणीचं होऊ शकतं. पण अशक्य नाही. त्यांनी सुमारे साडेतीनशे चित्रपटांसाठी गाणी लिहिली आहेत. त्या सगळ्यांचं संकलन ही खरोखरच जिकिरीची बाब आहे.

आशाजी आणि लताजींशी त्यांचे संबंध जिव्हाळ्याचे होते. त्या नेहमी आमच्या घरी येत. नौशाद साहेबांबरोबर ते मुंबई तसंच इतर शहरांत खूप फिरत. पण मरेपर्यंत त्यांना मुंबई कधीच आवडली नाही. त्यांना दि[illegible] आवडायची. त्यांचं सर्वाधिक प्रेम आपल्या गावावर सुलतानपूरवर होतं पण तिथे रोजीरोटी नव्हती.

आज त्यांची खूप आठवण येते. तेच माझं सर्वस्व होते. बरेचदा आम्ही दोघंच असताना ते दारात बसून मला शेर ऐकवायचे. त्यातलं सगळंच काही मला समजायचं असं नाही. पण त्यांचं असणंच माझ्यासाठी महत्त्वाचं होतं. आजही त्यांच्या आठवणीने मन भरून येतं. डोळ्यांत अश्रू तरळतात. पण मी ते निग्रहाने मागे सारते. कारण माझ्या डोळ्यात अश्रू पाहून मजरूह साहेबांना अतोनात दुःख होत असे. आणि त्यांना दुःख झालेलं मला कसं चालेलं? ●